**महाराष्ट्र जनशक्ती** | **ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!**

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २५९ वा | दिनांक : ११/०८/२०२५ | वार : सोमवार

## महायुतीचे घोटाळे उघड, निवडणूक आयोग, मोदी-शहा गप्प का? - संजय राऊतांचा सवाल



**मुंबई :** शरद पवारांना काही लोक निवडणुकीपूर्वी भेटले आणि १६० जागांवर विजय मिळवून देतो विशिष्ट रक्कम द्या अशी मागणी केली. असेच काही लोकं उद्धव ठाकरेंना लोकसभा आणि विधानसभेलाही भेटले होते. उद्धव ठाकरेंनी त्यांना सांगितले आमचा लोकशाहीवर विश्वास आहे, त्यावेळी मी तिथे उपस्थित होतो. देशातील वातावरण पाहता आम्ही लोकसभा जिंकू असे त्यांना ठाकरेंनी सांगितले आणि आम्ही जिंकलो ही. असे घोटाळे करत निवडणूक जिंकण्याची आम्हाला गरज वाटत नाही, असे उबाठाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे ह्या महायुतीचे अनेक घोटाळे आहेत. या घोटाळे करणाऱ्या सरकारच्या विरोधात अनेकदा आवाज उठवून देखील राज्यपालांपासून मोदी-शहा यांच्यापर्यंत कोणीच काही ऐकायला तयार नाही, असे म्हणत उबाठाचे नेते संजय राऊत यांनी महायुती वर टीकास्त्र डागले आहे. महाराष्ट्र लुटणाऱ्या या दगा बाज सरकारला पाठीशी घालते जात आहे. यामुळे लोकांमध्ये जात जागृती करणे हाच एकमेव पर्याय आमच्याकडे आहे.

संजय राऊत म्हणाले की, विधानसभेवेळी वेळी पुन्हा ते लोक आले तेव्हा आम्ही त्यांना सांगितले लोकसभा जिंकलो विधानसभेला आम्ही नक्कीच सत्तेवर येणार. तेव्हा त्या लोकांचे म्हणणं होते अडचणीतील ६५ जागा सांगा त्या आम्ही तुम्हाला EVM च्या माध्यमातून विजयी करुण देतो. आम्ही त्या गोष्टीला स्पष्ट नकार दिला. त्यांनी स्पष्ट सांगितले की सत्ताधाऱ्यांनी ही योजना तयार केली आहे, तुमचे अपयश मला दिसते आहे, पण आमचा निवडणूक आयोग आणि लोकशाहीवर विश्वास आहे असे आम्ही त्यांना सांगितले. पण आता या गोष्टीमध्ये तथ्य आहे असे दिसून येत आहे.

संजय राऊत म्हणाले की,राहुल गांधी यांनी निवडणूक आयोग आणि भाजपचा इतका मोठा घोटाळा बाहेर काढला. तरीसुद्धा निवडणूक आयोग राहुल गांधी यांना शपथपत्र मागत आहे. त्यांनी पुराव्यानिशी हे सगळे सांगितले असताना शपथपत्र मागितले जात आहे. राहुल गांधी देशाचे विरोधी पक्षनेते आहेत. ते जबाबदारीने बोलत असून त्यांनी पुराव्यानिशी बोलत आहे. मत चोरीच्या शहानिशा माध्यमांनीही केली तरीही निवडणूक आयोग पुरावे मागत असेल तर त्यांच्या डोळ्यावर पट्टी बांधली असून तोंडात बोळा कोंबलेला आहे हे दिसत आहे. या विरोधात इंडिया आघाडी उद्या आंदोलन करत आहे.

संजय राऊत म्हणाले की, माझे मत कुणाला गेले हे मला समजले पाहिजे तसा मला संविधानाने अधिकार दिला आहे. निवडणूक पद्धतीमध्ये इतके घोटाळे आहेत की मोदी-शहा-फडणवीस यांच्यासारखे लोक संपूर्ण निवडणूक पैशाच्या आणि सत्तेच्या जीवावर चोरतात. त्याच पद्धतीचे एजंट त्यांनी निर्माण केले आहेत. निवडणूक यंत्रणा पारदर्शक नाही हे सर्व घटनेतून दिसून येत आहे. मुंबई मराठी माणसांकडे राहू नये यासाठी निवडणूक आयोग काम करत आहे का? असा सवालही त्यांनी उपस्थित केला आहे.

## 'नरेस, सुरेस, परेस, चड्डीत राहायचं!' - मनसे नेते संदीप देशपांडे



**मुंबई :** दादरमधील कबुतरखाना बंद करण्याच्या मुद्द्यावरून सध्या मुंबईत जोरदार वाद पेटला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने शहरातील ५१ कबुतरखान्यांच्या परिसरात पक्ष्यांना दाणे घालण्यास बंदी घालण्याचे आदेश दिले असतानाही काही जैन समुदायातील व्यक्ती वेगवेगळ्या मार्गाने कबुतरांना दाणे टाकत असल्याचे समोर आले आहे. पोलिसांनी अशा व्यक्तींवर कारवाई केली असली, तरी त्यांच्या हट्टी आणि माजोरड्या वृत्तीवर संताप व्यक्त केला जात आहे.

या पार्श्वभूमीवर मनसे नेते संदीप देशपांडे यांनी परिधान केलेला टी-शर्ट सध्या चर्चेचा विषय ठरला आहे. हा टी-शर्ट घालून ते दादर परिसरात फिरताना दिसले. त्यांनी घातलेल्या या टी-शर्टवर "नरेस, सुरेस, परेस, चड्डीत राहायचं!" असा मजकूर लिहिलेला होता. हा संदेश म्हणजे मुंबईत राहूनही कायद्याला धाब्यावर बसवणाऱ्या अमराठी भाषिकांना अप्रत्यक्ष इशारा असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे मनसे आता दादर कबुतरखाना प्रकरणी अधिक आक्रमक होणार का? हे पहावे लागणार आहे.

मुंबई उच्च न्यायालयाने दादर कबुतरखाना बंद ठेवण्याचे आदेश कायम ठेवल्यानंतरही काही नागरिक कबुतरांना दाणे घालण्यापासून परावृत्त झालेले नाहीत. लालबाग येथील महेंद्र संकलेचा या व्यक्तीने आपली कार कबुतरखान्याजवळ आणून गाडीच्या छतावर ट्रे ठेवून कबुतरांना खायला दिले. स्थानिकांनी त्याला हटकले असता, "आम्ही अशा अजून १२ गाड्या आणणार आहोत. न्यायालयाने दाणे टाकायला मनाई केली आहे, पण मी गाडीवरून खायला घालतो," अशी उघडपणे माजोरडी भाषा केली होती. याप्रकरणी पोलिसांनी महेंद्र संकलेचाची गाडी जप्त करून त्याच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

यानंतर दादर कबुतरखाना ट्रस्टने आपली जबाबदारी टाळत परिसरात फलक लावून कबुतरांना दाणे न घालण्याचे आवाहन केले आहे. कोणीही कबुतरांना दाणे घालू नयेत आणि जर कारवाई झाली तर ट्रस्ट जबाबदार राहणार नाही, असेही ट्रस्टने म्हटले आहे. ट्रस्टने महापालिकेकडे सकाळी ६ ते ८ या वेळेत धान्य घालण्याची परवानगी मागितली आहे. पालिकेने मौखिक परवानगी दिल्याचे सांगितले जात असले तरी, ती अद्याप लेखी स्वरूपात मिळालेली नाही. त्यामुळे ट्रस्टने हायकोर्टाच्या आदेशाचा सन्मान ठेवत नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले आहे.

दादरप्रमाणेच गिरगाव चौपाटी परिसरातील कबुतरखान्यातही पक्ष्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढली आहे. न्यायालयाने नुकतेच स्पष्ट केले होते की, कबुतरखान्यांबाबत निर्णय घेताना नागरिकांच्या आरोग्याला प्राधान्य द्यावे. त्यामुळे आता मुंबई महापालिका गिरगाव चौपाटी येथील कबुतरखान्यावर काय पावले उचलणार, याकडे पक्षीप्रेमींसह नागरिकांचे लक्ष लागले आहे.

## महानगरपालिका निवडणुका महायुतीच्या वतीने लढवल्या जाणार -नीलम गोऱ्हे यांची माहिती



**पुणे :** पुणे शहरातील कोथरूड विधानसभा मतदारसंघात शिवसेना नेत्या आणि उपसभापती विधानपरिषद डॉ.नीलम गोऱ्हे यांच्या हस्ते शिवसेना सदस्य नोंदणी आणि आरोग्य शिबिराचा कार्यक्रम उदघाटन पार पडले. या कार्यक्रमाचे उपशहरप्रमुख नितीन पवार यांनी आयोजन केले होते.

त्यावेळी डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, कोथरूड विधानसभा मतदारसंघ हा महायुतीचा बालकिल्ला आहे. पण कोथरूड आणि शिवाजीनगर हे दोन मतदारसंघ तसेच पुण्यातील अनेक भाग शिवसेनेचे बालकिल्ले राहिल्याचे सांगत त्या पुढे म्हणाल्या की, लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीत आपल्या शिवसैनिकांनी प्रामाणिकपणे काम केले आहे. आता येत्या कालावधीत महानगरपालिकेची निवडणूक होणार आहे. त्या निवडणुका महायुतीच्या वतीने लढवल्या जाणार असल्याच्या सूचना पक्षश्रेष्ठींच्या असल्याचे त्यांनी सांगितले.

आरोग्य शिबिराबाबत बोलताना डॉ. गोऱ्हे म्हणाल्या, राज्यभरात महायुती सरकाराच्या माध्यमांतून आरोग्य शिबिराचे आयोजन केले जात आहे. त्या शिबिरांना नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत आहे. त्यातून एखाद्या नागरिकाला कोणत्याही आजाराचे निदान झाल्यास तात्काळ पुढील उपचार दिले जात आहे. जेणेकरून भविष्यातील आरोग्यविषयक धोके टाळणे शक्य होते. त्या दृष्टीने कोथरूड विधानसभा मतदारसंघात आरोग्य शिबिराचे आयोजन केले आहे. या आरोग्य शिबिराचा लाभ प्रत्येकाने घ्यावा, या निमित्ताने मी सर्वांना एक सांगू इच्छिते की, आपल्या सर्वांच्या पाठीशी महायुती सरकार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आहे.तसेच आपल्या सर्वांचे आशीर्वाद कायम आमच्या पाठीशी राहू द्या, असे आवाहन देखील त्यांनी उपस्थित नागरिकांना त्यांनी केले.

यावेळी युवासेना सचिव किरण साळी, सहसंपर्कप्रमुख सुदर्शना त्रिगुनाईत, शहरप्रमुख श्रद्धा शिंदे, अनिकेत जावळकर, सुप्रिया पाटेकर, मीनल धनवटे, विराज डाकवे, सुनील काकडे, राजू गोखले, उदय भेलके, लखन तोंडे, शुभम कांबळे, सुनील पासलकर, युवराज शिंगाडे, राजू विटकर, सुधीर जोशी तसेच तज्ञ डॉक्टर्स उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ११ ऑगस्ट २०२५


## केसापूर शिवारात बिबट्याने चार बकऱ्या व एका बोकडाचा पाडला फडशा




**कन्नड (अरुण थोरात) :** केसापूर ता.कन्नड परिसरात बिबट्याची दहशत वाढली असून केसापूर गावठाण जवळील दत्तू बाबुराव हारदे यांच्या शेतातील गोठयात चार अर्धवट खाल्लेले बकऱ्या मृत अवस्थेतील मिळून आल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाने कारवाई करून बिबट्याचा बंदोबस्त करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.या बाबत अधिक माहिती अशी की, दत्तू बाबुराव हारदे यांच्या केसापूर गावठाण नजिक शेतात बकऱ्यांचा गोठा असून दि.09 ऑगस्ट रोजी सकाळी नित्य नियमाप्रमाणे ते बकऱ्यांच्या गोठ्या कडे चक्कर मारण्यासाठी गेलेअसताना, त्यांना गोठ्यातील चार बकऱ्या मृत अवस्थेत दिसल्या तर एक बोकड फरफटत उचलून नेल्याचे आढळून आले, त्यांनी तत्काळ केसापूरचे सरपंच कल्याण पाटील हारदे यांना घटनेची माहिती दिली असता कल्याण हारदे यांनी तत्काळ कन्नड वन विभाग कार्यालय येथील वनपाल रफीक पठाण यांना कळवले. वन कर्मचारी आकाश आव्हाड व इतरांनी घटनास्थळी धाव घेतली बोरसर येथील पशुवैधकीय अधिकारी डॉ. वर्षा हनुमंते यांनी पंचनामा व शवविच्छेदन केले. या वेळी केसापूरचे सरपंच कल्याण हारदे, शेतकरी दत्तु हारदे, शेषनारायण हारदे, नारायण हारदे, जगन्नाथ हारदे, रघुनाथ हारदे, कडु हारदे, शुभम हारदे , गुलाब जाधव आदी ग्रामस्थांची उपस्थिती होती.

## ९० रक्तदात्यांनी केले रक्तदान



**छत्रपती संभाजीनगर :** मदर फाऊंडेस डे आणि भारताचा स्वातंत्र्य दिन हे औचित्य साधून,सामाजिक भान राखत दिनांक ९ ऑगस्ट २०२५ रोजी होली क्रॉस इंग्लिश हायस्कूल, छावणी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. ह्यात शिक्षक, पालक, माजी विद्यार्थी, जागरूक नागरिक अशा एकूण 90 रक्तदात्यांनी रक्तदान करून मानवतेचे कार्य केले. रक्तदानानंतर रक्त दात्यांना प्रमाणपत्र आणि अल्पोपहार देण्यात आला. दरवर्षी हा उपक्रम शाळा न चुकता घेत असते. रक्तदानाच्या यशस्वी आयोजनासाठी मुख्याध्यापिका सिस्टर सिंथिया फर्नांडिस, उपमुख्याध्यापिका सिस्टर जिनी, एन.सी.सी इन्चार्ज राजेंद्र ब्राह्मणे, काजल ठाकूर, एन.सी.सी चे कॅडेट्स, घाटी दवाखान्याचे डॉक्टर्स, नर्सेस ह्यांनी विशेष सहकार्य केले.

## गावोगावी वाचन संस्कृती रुजावी - के. एस. अतकरे



**कन्नड :** कन्नड तालुक्यात वाचन संस्कृती वृद्धिंगत होऊन वाचन चळवळ वाढावी, वाङ्मयीन चळवळीला बळ मिळावे नवे लेखक वाचक घडून त्यांच्यात सुसंवाद घडावा या उद्देशाने त्रैमासिक तिफण, तिफण वाचक चळवळ, भाषा, साहित्य, संस्कृती आणि संशोधन परिषद शाखा कन्नड , अ.भा. मराठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे शाखा कन्नड , आणि आजिवन शिक्षण व विस्तार सेवा शिवाजी महाविद्यालय कन्नड तसेच मराठी विभागाच्या पुढाकारातून हतनूर ता. कन्नड येथील शेतात शिवना नदी काठी ना. धो.महानोर अभिवादन निमित्त तिफण लेखक वाचक मेळाव्याचे आयोजन (ता. 3) करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ प्रकाशक कैलाश पब्लिकेशन्सचे संचालक के. एस. अतकरे होते तर उदघाटक म्हणून मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. सर्जेराव जिगे उपस्थित होते. मंचावर प्राचार्य डॉ. विजय भोसले, साहेबराव अकोलकर , कैलास अकोलकर, ॲड. कृष्णा जाधव, अशोक शेवगण, प्राचार्य अनिता खंडागळे, यांची उपस्थिती होती. वृक्षारोपण करून उदघाटन करण्यात आले. रानकवी ना. धो.महानोर यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रास्ताविक संयोजक तिफणकार डॉ. शिवाजी हुसे यांनी केले. ते म्हणाले की, लेखकांच्यासाठी साहित्य संस्था स्थापन झाल्या, साहित्य चळवळी अस्तित्वात असून विविध वाङ्मयीन कार्यक्रम होतात मात्र वाचक हा महत्वाचा घटक यापासून नेहमी कोसो दूर असतो. लेखक वाचक यांच्यात समन्वय व्हावा वाचन चळवळ वाढावी, मुलांना वाचनाकडे आकर्षित करावे या उद्देशाने हा मेळावा घेण्यात आला. के. एस. अतकरे म्हणाले की, तिफणच्या माध्यमातून ग्रामीण भागात मोठे काम होत असून त्यामुळे एक मोठी साहित्य चळवळ निर्माण होत आहे. गावोगावी वाचन संस्कृती रुजावी असे मत व्यक्त केले. यावेळी प्राचार्य डॉ. विजय भोसले म्हणाले की, सध्या विद्यार्थी , युवक वाचनापासून दूर जात आहे. त्यांना वाचनाची गोडी निर्माण व्हावी यासाठी गावोगावी वाचनालये, वाचन कट्टे , अभ्यासिका निर्माण होऊन त्यांना योग्य ते मार्गदर्शन झाल्यास सुसंस्कृत समाज निर्माण होईल. उदघाटकीय भाषणात डॉ. सर्जेराव जिगे यांनी ग्रामीण भागात साहित्यिक कार्यक्रम होऊन श्रमकरी समाज , वाचक लेखक यांना व्यासपीठ मिळावे यासाठी आम्ही प्रयत्नशिल असून नवसमाज निर्मितीसाठी सातत्याने नाविन्यपूर्ण उपक्रम आयोजित करीत आहोत. साहित्य चळवळीचे केंद्र ग्रामीण भाग व्हावा हा आमचा प्रयत्न आहे.त्यातूनच मानवतावादी समाज घडेल असे मत व्यक्त त्यांनी व्यक्त केले. अशोक शेवगण यांनी ना. धो.महानोर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकून महानोरांची कविता सादर करून आदरांजली अर्पण केली. ॲड. कृष्णा जाधव यांनीही मनोगत व्यक्त केले. या मेळाव्यात वाचन चळवळ वाढावी यासाठी वाचक जागृती अभियान, वाचन कट्टा, वाचक सर्वेक्षण, लेखकांच्या साहित्यावर चर्चासत्र, पुस्तके भेट योजना, शाळा दत्तक योजना, काव्यदिंडी, वाचन चळवळ रुजावी यासाठी दत्तक गाव घेणे, कवितेचे हॉटेल निर्माण करणे, विविध साहित्य लेखन स्पर्धा घेणे, साहित्य लेखन कार्यशाळा , पुस्तक प्रकाशन,ग्रंथालये व शाळा ,महाविद्यालये , साहित्यिक , वाचक यांच्यात समन्वय निर्माण करणे आदी उपक्रमा संदर्भात संकल्प करून ठराव करण्यात आले. लोकसहभागातून हे उपक्रम राबविले जाणार आहेत. कार्यक्रमास नायब तहसिलदार दिलीप कुमार सोनवणे,डॉ. अंबादास सगट, प्रा. रंगनाथ लहाने, डॉ. संजय गायकवाड, डॉ. शरद भिंगारे, डॉ. शिवाजी हुसे डॉ. रामचंद्र झाडे, डॉ. रुपेश मोरे, डॉ. पांडे, रायभान जाधव, नाना लहाने , भगवानराव लहाने, पुरुषोत्तम मनगटे, आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमासाठी स्वागताध्यक्ष ब्रम्हगिरी गोस्वामी , प्रकाश शहरवाले, विनायक अकोलकर, रामचंद्र काळे, प्रविण दाभाडे, ज्ञानेश्वर गायके, लक्ष्मण वाल्डे, भीमराव सोनवणे, श्रीराम दापके, सुरेश औटे,संदीप वाकडे, अजय दवंडे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन संदीप वाकडे यांनी केले तर आभार प्रविण दाभाडे यांनी मानले.


प्रवेश सुरू

डी.एम.एल.टी.

P.G.DMLT

फिजोओथेरिपी

डिप्लोमा ऑप्थोमेट्री

OT टेक्नीशियन

X-Ray, ECG

रेडीओलॉजी

संपर्क

9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ११ ऑगस्ट २०२५


## रोटरी क्लबच्या वतीने ब्रह्मकुमारी विश्वविद्यालय केंद्र मुरूम येथे रक्षाबंधन उत्साहात साजरा



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले) :** दि. ९ ऑगस्ट २०२५ रोजी ठीक सायंकाळी सहा वाजता रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय केंद्र मुरूम येथे रक्षाबंधन मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय केंद्र लोहारा येथील सरिता बहनजी होत्या. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून रोटरी क्लब मुरूम सिटीचे अध्यक्ष प्रा. डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी आणि सचिव कल्लप्पा पाटील हे होते.ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयाचे मुख्य केंद्र राजस्थान मधील माऊंट आबू येथे असून त्यांच्या अनेक शाखा जगातील वेगवेगळ्या देशांमध्ये आहेत. त्यांच्या माध्यमातून अध्यात्मिक शांतता आणि ध्यानधारणा हे मानव कल्याणासाठी किती महत्त्वाचे आहे याचा प्रसार आणि प्रचार करणारी एक आध्यात्मिक विश्वविद्यालय आहे असे प्रतिपादन कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा.डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी यांनी केले.ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय केंद्र मुरूम येथील सर्व बहनजी यांनी रोटरी क्लब मुरूमच्या सर्व सदस्यांना राखी बांधून रक्षाबंधन उत्साहात साजरा केला. अध्यक्षीय समारोपात सरिता बहनजी म्हणाल्या रक्षाबंधन हे एक बहीण भावाच्या नात्यातील दुरावा कमी करण्याचे काम करते आणि प्रेम वाढवण्याचे काम हे रक्षाबंधनाच्या माध्यमातून होतं. रक्षाबंधन हे बहिण भावाचे पवित्र नातं जपण्याचे काम या माध्यमातून होतं आणि हे कायमस्वरूपी टिकावं यासाठी आम्ही ब्रह्मकुमारी विश्वविद्यालयाच्या माध्यमातून प्रयत्न करतो.या कार्यक्रमात रक्षाबंधनाची भेट म्हणून रोटरी क्लब मुरूम सिटीच्या वतीने आणि रोटे शरणाप्पा धुम्मा यांच्या सौजन्याने ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय मुरूम केंद्राला फ्रिज भेट देण्यात आला.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ब्रह्माकुमारी विश्वविद्यालयाचे प्रमुख राजू भैय्या यांनी केले तर आभार रोटरी क्लब मुरूम सिटीचे सचिव कल्लप्पा पाटील यांनी केले.या कार्यक्रमासाठी रोटे सुनील राठोड ,रोटे.डॉ.नितीन डागा, एडवोकेट उदय वैद्य, प्रा राजेंद्र वाकडे, रोटे प्रकाश रोडगे, रोटे विष्णुदास मुंदडा आणि ब्रह्माकुमारी विश्वविद्यालय मुरूम केंद्राचे भक्तगण उपस्थित होते.

## कन्नड नगरपालिका हद्दीतील रात्रीचा अंधार झाला दूर



**कन्नड (अरुण थोरात):** कन्नड शहरात मुख्य रस्त्यावरती गेल्या पंधरा ते वीस दिवसापासून नगरपालिकेच्या काही तांत्रिक अडचणीमुळे पथदिवे बंद होते. कन्नड नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष तथा शिवसेनेचे माजी शहरप्रमुख डॉ. सदाशिव पाटील यांच्या लक्षात ही गोष्ट आल्यानंतर त्यांनी शिवसेनेच्या माध्यमातून बंद असलेल्या पथ दिव्या बद्दल आवाज पुकारला. कन्नड शहरातील सणा सुदीच्या काळात बंद असलेले पथदिवे बद्दल ही माहिती त्यांनी तात्काळ आमदार संजनाताई जाधव यांना माहिती दिली.कन्नड शहरातील मुख्य रस्त्यावर छोटे व्यवसायिक व फळ विक्रेते हे अडचणीत आलेले आहे. त्यामुळे नगरपालिकेच्या माध्यमातून या ठिकाणी बंद असलेले पथदिवे ताबडतोब चालू करण्याचे आदेश आपण मुख्याधिकारी यांना द्यावे. कन्नड नगरपालिकेचे मुख्याधिकारी ऋषिकेश भालेराव यांच्याशी संपर्क साधला असताना त्यांनी तात्काळ या गोष्टीत लक्ष घालून पथदिवे चालू करण्याचे आदेश ठेकेदार श्री मोहिते यांना देण्यात आले. छोटे-मोठे व्यवसायिक व नागरिक यांच्या समस्या लक्षात घेऊन श्री मोहिते यांनी मुख्य अधिकारी भालेराव यांनी आदेश काढून सर्व लाईट चालू करून दिले. त्यामुळे कन्नड शहरांमधील होत असलेला अंधार दूर होऊन आता प्रकाशमय झालेला आहे याबद्दल कन्नड शहरातील जनतेने व व्यापारी आणि छोटे व्यवसायिक यांनी शिवसेनेचे माजी शहर डॉ सदाशिव पाटील यांचे आभार व्यक्त केले.

## लिफ्ट देण्याच्या बहाण्याने तरुणीवर अत्याचार



**पुणे :** नोकरीचे दैनंदिन काम संपवून थेऊर फाटा येथून खासगी पिकअप चालकाने लिफ्ट देण्याच्या बहाण्याने अंधाराचा फायदा घेऊन तरुणीचा विनयभंग केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी पिकअप चालक नंदु जाधव (25) याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका 26 वर्षीय तरुणीने तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार तरुणी ही दैनंदिन नोकरीचे काम आटोपून थेऊर फाटा येथून राहत्या घरी जाण्याकरता खासगी वाहनाची वाट पाहत हाती. यावेळी नंदु जाधव हा पिक घेऊन तरुणी उभी असलेल्या ठिकाणी आला. त्याने तरुणीला गाडीत बसण्याकरिता विचारणा केली. त्यानुसार होकार देत तरुणी आरोपीच्या पिकअपमध्ये बसली. यानंतर आरोपीने फिर्यादीला अश्लील स्पर्श करून खांद्यावर हात टाकला. त्यानंतर त्याने तिला काय होतंय एवढं, मला भाडे देवु नका, फक्त खुश करा, असे म्हणून तरुणीचा विनयभंग केला. याप्रकरणी लोणी काळभोर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ११ ऑगस्ट २०२५

# सरपंचाची ८० वर्षीय वृद्धाला लाथा बुक्क्याने मारहाण



**भंडारा :** भंडारा जिल्ह्यातील लाखनी तालुक्यातील पालांदूर पोलीस ठाणे हद्दीतील मौजा-ढिवरखेडा येथील रहिवासी व गोंदी येथील गटग्रामपंचायतीचे विद्यमान सरपंच गणेश खुशाल हत्तिमारे यांनी लाथा बुक्क्यांनी गोंदी येथील एका ८० वर्षीय वयोवृद्धाला जबर मारहाण करत गंभीर जखमी केल्याचा आरोप आहे. ही घटना बुधवार, ६ जुलै रोजी सकाळी ९ वाजताच्या सुमारास घडली. पीडित वृद्धाचे नाव श्रावण सखाराम कांबळे असे असून, त्यांची शेतजमीन ढिवरखेडा शिवारात आहे. ही जमीन सन २०२३ मध्ये ग्रामपंचायतीने ठराव घेऊन अतिक्रमणमुक्त केली होती. दरम्यान, सरपंच हत्तीमारे अधूनमधून त्या जागेवर जात असत. बुधवारी, 6 जुलै रोजी सकाळी कांबळे हे याच जागेवर गेले असता, हत्तीमारे यांनी "तू इकडे का आलास?" असे विचारत त्यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत कांबळे जमिनीवर पडले, ज्यामुळे त्यांच्या उजव्या मांडीला गंभीर दुखापत झाली. हत्तीमारे यांनी त्यांना पुन्हा मारण्याची धमकीही दिली, असे कांबळे यांनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार समोर आले आहे.

या प्रकरणी कांबळे यांनी पालांदूर पोलिसांकडे तोंडी फिर्याद दिली. पोलिसांनी सदर गुन्हा अदखलपात्र स्वरूपाचा असल्याचे नमूद करत विविध कलमान्वये नोंद घेतली आहे. पुढील तपास सहायक फौजदार गायधने करत आहेत. हे प्रकरण राजकीयदृष्ट्याही संवेदनशील बनले आहे, कारण आरोपी गणेश हत्तीमारे हे लाखनी तालुक्यातील पालांदूर मंडळ भाजप युवा मोर्चाचा अध्यक्ष असून त्यांची स्थानिक व जिल्हा तसेच राज्यस्तरावरच्या राजकीय घडामोडींचे समन्वयक म्हणून नियुक्ती केली गेली आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे स्थानिक नागरिकांचे आणि राजकीय वर्तुळाचे लक्ष लागून आहे.

# कबुतरखान्याच्या मुद्द्यावरून जैन मुनींचा आंदोलनाचा इशारा



**मुंबई :** मुंबईतील कबुतरखान्यांच्या परिसरात पक्ष्यांना खाद्य टाकण्यास उच्च न्यायालयाने घातलेली बंदी कायम ठेवल्यानंतर जैन समाजाने तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. न्यायालयाचा आदेश लागू असूनही अलीकडेच दादर कबुतरखान्याजवळ काही जैन बांधवांनी कबुतरांना धान्य टाकले होते. मात्र, पोलिसांनी तात्काळ हस्तक्षेप करत त्यांना थांबवले. या कारवाईनंतर जैन समाजाने आता आक्रमक पवित्रा घेतला असून, १३ ऑगस्टपासून उपोषणाला बसणार आहेत. तर वेळ पडल्यास शांतताप्रिय असणारा आमचा समाज शस्त्रंही हातात घेईल आणि कोर्टाच्या आदेशालाही जुमानणार नसल्याचा इशारा जैन मुनी निलेशचंद्र विजय यांनी दिला आहे.

यासंदर्भात बोलताना जैन मुनी निलेशचंद्र विजय म्हणाले, आम्ही सत्याग्रह आणि उपोषणाचा मार्ग वापरणार आहोत. शस्त्र उचलणे हा आमचा स्वभाव नाही, पण धर्माविरोधात पाऊल उचलले गेले तर आम्ही गप्प बसणार नाही. आम्ही भारताचे संविधान, कोर्ट आणि सरकारला मानतो, परंतु आमच्या धार्मिक तत्त्वांवर गदा आणली तर आम्ही कोणालाही मानणार नाही.

... तर कोर्टाच्या आदेशालाही जुमानणार नाही जैन मुनी पुढे म्हणाले, १३ ऑगस्टपासून आम्ही उपोषणाला बसणार आहोत. मी एकटा आंदोलनाला बसणार नाही. देशभरातील १० लाख जैन बांधव इकडे उपोषणाला बसतील. गरज पडल्यास शांतताप्रिय समाज असतानाही आम्ही धर्माच्या रक्षणासाठी शस्त्र उचलण्यास मागेपुढे पाहणार नाही. कोर्टाच्या आदेशालाही आम्ही जुमानणार नाही.

जैन धर्मालाच का लक्ष्य केले जात आहे? निलेशचंद्र विजय यांनी आरोप केला की, हा निर्णय राजकीय हेतूने आणि निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर घेतला गेला आहे. आमच्या 'पर्युषण पर्वा'नंतर पुढचा निर्णय घेऊ. जीवदया हा आमच्या धर्माचा मूलभूत सिद्धांत आहे. मुंगीपासून हत्तीपर्यंत कुठल्याही जीवाचा वध होऊ नये, असे आमच्या धर्मात सांगितले आहे. मग जैन धर्मालाच का लक्ष्य केले जात आहे? असा सवालही त्यांनी केला. दारू व मांसाहारामुळे किती लोक मरतात, हेही दाखवा, असे निलेशचंद्र वियज यांनी म्हटले आहे.

दरम्यान, मुंबई उच्च न्यायालयाने कबुतरांना खाद्य टाकण्यास बंदी असतानाही, काही लोक त्याचे उल्लंघन करत आहेत. याप्रकरणी मुंबई महानगरपालिकेने आता कठोर पावले उचलली असून, अशा व्यक्तींवर कडक कारवाई सुरू केली असून, दंड आकारण्यात येत आहे. १३ जुलै ते ३ ऑगस्ट या कालावधीत पालिकेने १४२ प्रकरणे नोंदवली असून, एकूण ६८ हजार ७०० रुपये दंड वसूल केला आहे. विशेष म्हणजे, सर्वाधिक दंड हा चर्चेत असलेल्या दादर पश्चिम भागातील कबुतरखान्यावरून गोळा करण्यात आला आहे. या ठिकाणी ५१ व्यक्तींकडून २२ हजार २०० रुपये दंड वसूल झाला आहे.

# कॉम्रेड शरद पाटील यांच्या तत्त्वज्ञानावर विशेष परिसंवाद




**छत्रपती संभाजीनगर :** प्रगतिशील लेखक संघ, छत्रपती संभाजीनगर आणि लोकसंवाद फाउंडेशन यांच्यावतीने गांधी भवन येथे प्राच्यविद्या पंडित कॉम्रेड शरद पाटील जन्मशताब्दी वर्षानिमित्त 'कॉम्रेड शरद पाटील यांचे तत्त्वज्ञान आणि सामाजिक परिवर्तन' या विषयावर विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

या परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ तथा विचारवंत डॉ. उमेश बगाडे हे होते, तर परिसंवादात स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथील विचारवंत तथा भाषातज्ज्ञ डॉ. दिलीप चव्हाण आणि महाराष्ट्र राष्ट्रीय विधी विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर येथील प्राध्यापक तथा साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त लेखक प्रा. राहुल कोसंबी यांनी भाष्य केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सत्यशोधक समाज प्रतिष्ठानचे अध्यक्ष के. ई. हरिदास यांनी केले तर प्रगतिशील लेखक संघाचे सचिव डॉ. समाधान इंगळे यांनी सूत्रसंचालन केले.

याप्रसंगी ज्येष्ठ ग्रामीण साहित्य व समीक्षक डॉ. वासुदेव मुलाटे, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते साथी सुभाष लोमटे, ॲड. वैशाली डोळस, सविता अभ्यंकर, कॉ. अण्णा सावंत, प्रगतिशील लेखक संघाचे अध्यक्ष डॉ. सुधाकर शेंडगे, लोकसंवाद फाउंडेशनचे अध्यक्ष डॉ. राजेश करपे, म. गांधी स्मारक निधी केंद्राचे कार्याध्यक्ष डॉ. मच्छिंद्र गोरडे, प्राचार्य डॉ. राम चव्हाण, डॉ. बंडू सोमवंशी, डॉ. रामचंद्र काळुंखे, सोमिनाथ अहेर, डॉ. सुभाष बागल, ॲड. अभय टाकसाळ, प्रा. भारत सिरसाट, पुंडलिक अतकरे, डॉ. गणेश मोहिते, डॉ. अनिरुद्ध मोरे, डॉ. भारत पगारे, डॉ. हंसराज जाधव, डॉ. उमाकांत राठोड, अनंत भवरे, डॉ. संजय वाघ, कॉ. भगवान भोजने यांच्यासह मोठ्या संख्येने श्रोते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी उमेश इंगळे, समाधान फदाट, प्रा. रविराज काळे आदींनी परिश्रम घेतले.

